चांदा ते बांदा योजने अंतर्गत स्थापन केलेल्या "राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" आणि "जिल्हास्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" करीता प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करणे.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : चांबांयो १६१७/प्र.क्र.२६/का.१४७५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०९ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :-

१) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.डिएपी १०१५/प्र.क्र.५१/१४८१,दिनांक २९/०६/२०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.डिएपी १०१६/प्र.क्र.१८६/१४८१,दि. १८/११/२०१६.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही २०११/प्र.क्र.१३७/का.१२, दि.१७/१२/२०१६.
४) नियोजन विभाग, शासन परिपत्रक, क्र.डिएपी १०१७/प्र.क्र.३८/१४८१, दि. ०७/०३/२०१७.
५) नियोजन विभाग, शासन परिपत्रक, क्र.चांबायो १६१७/प्र.क्र.२६/१४८१, दि. १२/०९/२०१७.

-: शासन परिपत्रक :-

चंद्रपूर व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील साधनसंपत्तीचा इष्टतम वापर करण्याकरिता नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये चांदा ते बांदा योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली असून सदर निर्णयातील परिच्छेद क्रमांक १३ येथे योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर नियोजन विभागाच्या अधिपत्याखाली "राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" आणि दोन्ही जिल्ह्यांकरीता "जिल्हास्तरावर जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" स्थापन करण्याची तरतूद आहे. त्यानुसार नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार राज्यस्तरावर नियोजन विभागाच्या अधिपत्याखाली "राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" आणि दोन्ही जिल्ह्यांकरीता "जिल्हास्तरावर स्वतंत्र जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" स्थापन करण्यात आले असून त्यासाठी पद निर्मिती करण्यात आली आहे.

२. सामान्य प्रशासन विभागाचे संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयात प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांबाबत अटी व शर्ती, कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यातील परिच्छेद क्रमांक ६(५) नुसार चांदा ते बांदा योजनेंतर्गत फक्त "जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" करीता प्रतिनियुक्तीने भरावयाच्या "गट अ व गट ब (राजपत्रित)" पदांकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणे, उमेदवारांच्या गुणवत्तेनुसार एका पदासाठी ३ अधिकारी या प्रमाणे पसंतीची यादी तयार करणे याकरिता नियोजन विभागाचे संदर्भाधीन क्रमांक ५ च्या शासन परिपत्रकान्वये अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/

सचिव (नियोजन) यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या त्रिसदस्यीय कार्यकक्षेमध्ये आता "राज्यस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" करीता प्रतिनियुक्तीने भरावयाच्या "गट अ व गट ब (राजपत्रित)" पदांचा सुध्दा समावेश करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संकेताक २०१७११०९१८०१०८५४१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Yatin Arvind Pimpley

Digitally signed by Yatin Arvind Pimpley
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0caa48d6ba1e76bde48feb1f45845828c289933f651f16d330b6ebf2a692991f, cn=Yatin Arvind Pimpley
Date: 2017.11.09 17:49:49 +05'30'

(य. अ. पिंपळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
२. मा. राज्यमंत्री (नियोजन) यांचे खाजगी सचिव,
३. प्रधान सचिव (नियोजन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,
४. उप सचिव (का.१४२१/(नियोजन विभाग, मंत्रालय खुद्दची आस्थापना), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उप सचिव (का.१४७५/चांदा ते बांदा योजना) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. जिल्हाधिकारी, चंद्रपूर व सिंधुदुर्ग,
७. कार्यासन १४७५ (निवडनस्ती).